# ओळख सेवावृत्तीची

**प्रा. वृंदा देशपांडे-जोशी**

त्याग, प्रेम, सर्वस्व समर्पण यासारखी मूल्य जेव्हा आठवतात तेंव्हा बऱ्याच वेळेला आपण स्वातंत्र्यपूर्व काळाबाबत बोलत आहोत, असं स्वाभाविकपणाने वाटतं. पण आजच्या धकाधकीच्या जीवनात आणि मूल्य संपूर्णपणे लयाला चालली की काय असं वाटणाऱ्या काळातही; काही ठिकाणी संस्थात्मक पातळीवर, व्यक्तिगत पातळीवर ही मूल्य जीवनामध्ये प्रतिबिंबित होताना दिसतात. व्यक्तिगत सुखदुःखाचा, प्रगतीचा, आर्थिक लाभाचा भाग बाजूला ठेवून समाजासाठी जीवन समर्पित करण्यास प्रेरित होतील अशी माणसं घडवणा-या काही संस्था, संघटनं आपण आजही अनुभवतो. त्यापैकीच एक म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ. 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' आणि 'सेवा' हे दोन शब्द समानार्थी व्हावेत, इतकं प्रदीर्घकाळ संघानं सेवा कार्य दिलेलं आहे; भविष्यातही देत राहील.हे सर्व आठवण्याचं कारण म्हणजे ऑगस्ट महिन्यात प्रकाशित झालेलं श्री. दिलीप पांडुरंग धनेश्वर यांचे 'सेवासंस्था कार्यव्यवस्थापन' हे पुस्तक.

श्री. दिलीपजी हे जवळपास गेल्या चार दशकांपासून वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. आपला 'व्यवसाय' ही समाजाची 'सेवा' असावी या संस्कारात ते लहानाचे मोठे झाले.व्यवसाय आर्थिक फायद्यासाठी, नफ्यासाठी करायचा असतो या धारणेपेक्षा पैसा उदरनिर्वाहापुरता, गरजेपुरता असावा आणि आपलं ज्ञान, आपलं कौशल्य ज्या समाजात आपण लहानाचे मोठे झालो त्या समाजातल्या दीनदलितांची, गरजवंतांची सेवा करण्यामध्ये आपल्या आयुष्याचं सार्थक मानावं ही त्यांची धारणा. त्यामुळेच शहरात राहून काम करतानाच अहमदनगर जिल्ह्यातील आपलं मूळ गाव 'शेंडी' या ठिकाणी त्यांनी आवर्जून प्रदीर्घकाळ सेवा दिलेली दिसते. शांत, मनमिळावू स्वभाव असलेल्या, इतरांचं दुःख माझं दुःख आहे असं मानणाऱ्या या माणसाने अनेकांच्या वेदना दूर केल्या.

ग्रामीण भागामध्ये आरोग्याच्या बाबतीत जी एक दैववादी भूमिका दिसते त्यापेक्षा मुळात जाऊन आजाराची शास्त्रीय कारणं जाणून घ्यावीत आणि योग्य वेळी, योग्य उपचार करावा ही मानसिकता त्यांनी रुजवली. गावात काम करताना लोकांच्या आरोग्याबरोबरच समाजजीवनातील इतर प्रश्नही त्यांच्या लक्षात येत गेले आणि सर्वांगीण जीवनाच्या बाबतीत विचार करत जिथे जिथे मदतीचा हात देणं शक्य आहे तिथे मुक्त हस्ते मदत करत गेले. स्वतःच्या वैद्यकीय व्यवसायाबरोबरच 'वनवासी कल्याण आश्रम' आणि 'जनसेवा रक्तपेढी'च्या माध्यमातून त्यांच्या सामाजिक कार्याची भूमिका तयार होत गेली. ज्येष्ठ बंधू कै. दादा धनेश्वर यांच्या समर्पित कार्याचा अनुभव जवळून घेतल्याने स्वतःच्या कार्याचा निश्चय दृढ होत गेला. प्रत्यक्ष कार्य करत कार्यपद्धतीचे त्यांनी ग्रहण केलेले संस्कार आणि कार्यपद्धतीचे केलेले चिंतन म्हणजे त्यांचे हे पुस्तक.

'सेवासंस्था कार्यव्यवस्थापन' हे दिलीप धनेश्वर यांचे पुस्तक 22 प्रकरणांमध्ये विभागलेले आहे. या 22 प्रकरणांची शीर्षके बघितली तरीसुद्धा आपल्याला लेखकाची शास्त्रीय दृष्टीने विचार करण्याची पद्धती सहजच लक्षात येते. त्यांनी व्यवस्थापनातील घटक स्पष्ट करताना अधिष्ठान किंवा उद्देश, कार्यकर्ता, साधनसामग्री आणि प्रयत्न या गोष्टींवर भर दिलेला आहे. 'आपले सेवा प्रकल्प हे एखादी इन्स्टिट्यूट न होता ऊर्जास्त्रोत बनले पाहिजेत, ही लेखकाची विचारसरणी सेवा कार्याकडे बघण्याचा दृष्टिकोन व्यक्त करते. यशस्वी व्यवस्थापनासाठी मनुष्यबळास प्रेरणा देणे, सुसंवाद प्रस्थापित करणे, आणि योग्य निर्णय प्रक्रिया विकसित करणे या त्रिवेणी संगमाला ते महत्त्व देतात. संस्था म्हणजे केवळ संघटन किंवा चळवळ नाही तर राष्ट्र उभारणीच्या प्रदीर्घ प्रक्रियेमधील

एक टप्पा आहे.

व्यवस्थापनातील मनोभूमिका स्पष्ट करताना विचारांमधल्या सकारात्मकतेला महत्त्व देतात. श्रमदानाला 'श्रमानुभव' हा जो पर्यायी शब्द आलेला आहे तो त्या दृष्टीने विचारणीय वाटतो. बदल हा सुरुवातीस मनावरील दबाव वाढवत असतो परंतु बदलापूर्वी कर्मचाऱ्यांसोबत आधी पुरेशी संवाद प्रक्रिया सुरू केली पाहिजे. प्रशिक्षण, गटचर्चा याद्वारे त्यांना बदल आणि बदलाचे परिणाम समजावून दिल्यास सर्व शंका आणि संशय नाहीसे होतात; त्यामुळे बदलासाठी लोक तयार होतात.

व्यवस्थापनाच्या केंद्रस्थानी असणारी व्यक्ती योग्य मनोधारणेची असावी लागते. आत्मकेंद्रित स्वभाव, क्षमाशीलतेचा अभाव, प्रत्येक गोष्टीत काहीतरी खोड काढणे, सतत नकारात्मक भूमिकेत आणि विचारात राहिलं तर तो तुमचा स्वभाव बनतो. मीपणाची भावना, नकारात्मकता, स्वभावातील यशाचे धनी आपण व अपयशासाठी दुसऱ्यास जबाबदार धरण्याची वृत्ती हे अवगुण व्यवस्थापकाच्या अंगी नसावेत. व्यवस्थापकाची भूमिका ही हातात छडी घेऊन फिरणाऱ्या हेडमास्तरची न राहता कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर हात ठेवून मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शकाची असावी.

स्वानुभवातून साध्या, सोप्या, सरळ संवादी भाषेत लेखन करणाऱ्या दिलीप धनेश्वर यांनी या संपूर्ण पुस्तकांमध्ये प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक संदर्भांबरोबरच पाश्चात्य अभ्यासकांचेही संदर्भ दिलेले आहेत. मार्मिक श्लोक, व्याख्या, उद्धृते यामुळे पुस्तक वाचनीय झालेले आहे.

---------------------------------------------------------------------------------------------